# शहीद जवानाच्या आईचे पत्र

**सोशल मीडियावर स्क्रोल करत असताना-शहीद फ्लाईट लेफ्टनंट अभिजित गाडगीळ यांच्या आई, अभिजित एअर सेफ्टी फाउंडेशनच्या विश्वस्त, जीत एरोस्पेस इन्स्टिटट्यूटच्या फॉर्मर डायरेक्टर - कविता गाडगीळ यांचे मूळ इंग्रजी पत्र वाचायला मिळाले. जे जे चांगले वाचायला मिळेल ते मराठीत असावे आणि आपण ते वाचावे या भावनेतून या पत्राचा अनुवाद केला आहे. पत्र लांबलचक आहे पण महत्त्वाचे आहे. वाचा, शेअर करा, विचार करा.**



**माझ्या प्रिय भारतीय बंधुभगिनींना,**
**सप्रेम नमस्कार!**

आज माझ्या मुलाचा वाढदिवस आहे. माझा मुलगा म्हणजे फ्लाईट लेफ्टनंट अभिजित गाडगीळ! अभिजित आज असता तर ५१ वर्षांचा झाला असता पण माझ्यासाठी मात्र तो २७ वर्षांचाच आहे अजूनही. कुठल्याही आईसाठी तिचं मूल कितीही मोठं झालं तरी ते कायम लहानच असतं म्हणून नाही पण अभिजित २७ वर्षांचा असताना घडलेल्या घटनेने जणू काळ गोठला आणि सगळं जिथल्या तिथे थांबलं.

२००१ मध्ये सप्टेंबरच्या त्या रात्री अभिजितने त्याच्या 'मिग -२१' मधून टेकऑफ केलं. त्यानंतर अवघ्या ३३ सेकंदांमध्ये सगळं होत्याचं नव्हतं झालं. अभिजितचं 'मिग-२१' क्रॅश झालं. काही म्हणजे काही हाती लागलं नाही. फक्त रिकामं भकास आकाश आणि जीवघेणी शांतता तेवढी मागे राहिली त्या तसल्या जीवघेण्या शांततेचं ओझं अनेक वर्षं मनावर आहे, म्हणूनच मी आज तुम्हा सगळ्यांशी बोलायचं ठरवलंय.

एखाद्या हिंसक प्रसंगानंतर येणारी शांतता मोठी भीषण असते. भुतकाळातली सुखदुःख, श्वास, जगणं हे सगळं नाहीसं झाल्यामुळे निर्माण झालेली ती एक पोकळी असते. ही पोकळी उरावर घेऊन जगण्याच्या यातनांची कल्पनाच न केलेली बरी.

ती तसली भीषण पोकळी आता मला परत जाणवू लागली आहे आणि त्यातच युद्ध हवं म्हणणाऱ्या आवाजांचे सूरही टिपेला पोहोचले आहेत. मी १२ वर्षांची होते तेव्हा १९६२ चं युद्ध झालं. आमच्या जगण्यातलं सगळं निरागसपण त्या युद्धानं हिरावून घेतलं. आपली तरणीताठी मुलं गमावलेल्या, मोडून पडलेल्या आयांना बघत मी लहानाची मोठी झाले. नुकतंच लग्न झालेल्या आणि नवरा युद्धात कामी आल्यावर सर्वस्व गमावलेल्या कितीतरी तरुण मुली पाहिल्या आहेत मी. पुढे माझंच लग्न हवाईदलातल्या एका धडाडीच्या अधिकाऱ्याशी झालं. त्यानंतरची कितीतरी युद्ध आम्ही दोघांनी एकत्र पाहिली.

१९७१ चा तो कडाक्याचा हिवाळा मी फक्त हेडलाईन्समधून बघितलेला नाही तर प्रत्यक्ष अनुभवलाय. माझा नवरा तेव्हा जोरहाटवरुन सतत मोहिमांवर जात असे. कधी युद्धभूमीवर लढणाऱ्यांसाठी राशन पोहोचवायचं म्हणून तर कधी पूर्व पाकिस्तानातून जखमी किंवा मृत सैनिकांना परत आणायचं म्हणून त्याच्या अविश्रांत फेऱ्या सुरू असत. जीव धोक्यात घालणाऱ्या मोहिमांसाठी तो टेकऑफ करायचा तेव्हा मागे एकाकी धावपट्टीवर उभी राहून कित्येकदा मी त्याच्या सुरक्षेसाठी प्रार्थना केली. युद्धासारखी वाटणारी शांतता आणि शांतता ढवळून टाकणारी युद्ध हे सगळं मी जवळून पाहिलंय.

ज्यांनी कधी ना कधी युद्धावर गेलेल्या कुणाच्या तरी वाटेकडे डोळे लावून बसणं काय असतं हे अनुभवलंय त्यांनाच युद्ध हे कुठल्याही समस्येवरचं उत्तर नाही याची जाणीव असते, याची मला पुरेपूर कल्पना आहे. युद्ध म्हणजे विनाश. युद्ध म्हणजे नांदत्या कुटुंबांचे लचके तोडणं. युद्ध हा त्याग आहे आणि त्या त्यागाची अपेक्षाही सहसा अशाच लोकांकडून केली जाते, ज्यांच्याकडे मुळातच फार काही नसतंच. युद्धात बहुतेकवेळा सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीय शेतकऱ्यांची, कर्मचाऱ्यांची, नोकरदारांची आणि शिक्षकांची मुलंच कामी येतात. श्रीमंतांची मुलं तिथपर्यंत कधीच पोहोचत नाहीत. त्यामुळेच कर्त्यासवरत्या मुलाच्या बदल्यात मिळणारा तिरंगाही सर्वसामान्य आयांच्याच वाट्याला येतो.

युद्धाची खरी किंमत नेहमी बायकांनाच मोजावी लागते. ती किंमत काय असते? आपली तरुण मुलं गमावल्यावर त्यांच्या मागे कुढत जगत राहाणं, नवरा गमावल्यावर आपलं दुःख बाजूला ठेवून एकटीने मुलांना वाढवणं, युद्धात भाऊ गेल्यानंतर उरलेलं आयुष्य भावाची उणीव घेऊन सैरभर जगत राहाणं.

परवा पहलगाममध्ये जे झालं त्यानंतर देशात उफाळून आलेला संताप मला दिसतो आहे. मला तो कळतोही आहे. पण म्हणूनच मला तुम्हाला कळकळीची विनंती करायची आहे, आपल्या तरुण तडफदार मुलांना वृथा अभिमान आणि सूडाच्या तोंडी देण्यापूर्वी थांबा आणि सारासार विचार करा. मोठमोठ्या व्यासपीठांवर, न्यूज चॅनल्सच्या चर्चांमध्ये किंवा अगदी सोशल मीडियावरच्या चर्चेत 'युद्ध हाच उपाय' म्हणून कंठशोष करणाऱ्यांना युद्धाची किंमत मोजायची नाही, नसते. वेळ आलीच तर तुमचीआमची मुलं, विद्यार्थी, शेजारी, प्रियजन - पर्यायाने तुम्हीआम्ही त्या युद्धाची किंमत मोजतो. किंमत म्हणजे फक्त तिरंग्यात लपेटून आलेले आपल्या माणसांचे मृतदेह नव्हे युद्धात झालेली सर्व प्रकारची हानी भरुन यायला कितीतरी वर्ष जावी लागतात. कितीतरी पिढ्या मातीमोल होतात तरी युद्धाच्या जखमा भरत नाहीत आणि भविष्य म्हणजे फक्त अंधकार असतो!

अण्वस्त्र सज्ज शेजाऱ्यांमधल्या युद्धाचा अर्थ, त्याची भीषणता, गांभिर्य आपल्यापैकी किती लोकांना कळतं मला माहिती नाही. पाकिस्तान अत्यंत अस्थिर आणि आततायी देश आहे. 'नो फर्स्ट यूझ' हे धोरण त्या देशाला मान्य नाही. अण्वस्त्राचा वापर झाला तर अवघ्या काही तासांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय (आणि पाकिस्तानीही!) नागरिक मरतील. आपल्या जमिनी आणि नद्या तह्हयात विषारी होतील. साडेतीन कोटी लोक आयुष्यभर 'मरण आलं असतं तर बरं' अशा वेदना घेऊन जगतील आणि त्या वेदनांवर कुठलीही औषधं कधीही पुरे पडणार नाहीत.

तुम्हाला माहितीये? ८० कोटी भारतीय रेशनच्या धान्यावर जगतात. तरुणांमध्ये बेरोजगारीचं प्रमाण प्रचंड आहे. भारतीय सैन्यदलांच्या धाडसाबद्दल दुमत नाही पण आपल्याकडे एक लाख सैनिक आणि १२,००० अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. आपल्या हवाईदलाला ४२ स्क्वाड्रन्सची गरज आहे, पण आपल्याकडे आहेत कशाबशा ३१, त्यातलीही बहुतेक विमानं आता खूप जुनी आहेत. नौदलाकडे १५ पेक्षा कमी पाणबुड्या काम करण्याच्या अवस्थेत आहेत आणि चीनकडे मात्र सुमारे ७० पाणबुड्यांचा ताफा आहे उद्या खरंच युद्ध सुरू झालं तर आपण कसेबसे दोन आठवडे लढू शकू, याची कल्पना आहे आपल्याला? सैनिकांचे बूट, जॅकेट्स, रेडिओ, रायफल्स, टेंट्स, औषधं आणि माफ करा, मला हा शब्द लिहिणंही जड जातंय, पण अगदी शवपेट्यांसाठीही आपण इतरांवर अवलंबून आहोत हे आपल्यापैकी किती लोकांना माहिती आहे? आणि आपण युद्धाचे मनोरथ रचत असताना तिकडे चीन मात्र अरुणाचल प्रदेश, लडाख, सिक्कीम आणि आपल्या हातून निसटू शकेल असं सगळं सगळं गिळंकृत करायला बसलाय, हे दिसतंय का कुणाला? अमेरिका आपल्याला सहानुभूती देईल, भाषणं देईल, महागडा शस्त्रसाठा देईल, पण त्यांची मुलंबाळं आपल्याला देणार नाही, हे लक्षात असुदे 'युद्ध हवं' म्हणणाऱ्या सगळ्यांच्याच.

आपल्यावर झालेल्या अन्यायाला पोटात घ्या असं मी अजिबात म्हणत नाही. पहलगामचा बदला घ्यायला हवाच. या सगळ्याला जबाबदार असलेल्यांना सुळावर चढवून आपल्याला न्याय मिळायलाच हवा. आपल्या इंटेलिजन्सचा दर्जा सुधारायला हवा. संरक्षण अधिक काटेकोर हवं. अपयश समोर यायला हवं आणि त्याची दुरुस्तीही व्हायला हवी. वरपासून खालपर्यंत जे जे दोषी आहेत त्यांची गच्छंतीही व्हायलाच हवी. पण सुडाच्या वारुवर उधळताना आपल्यातलं शहाणपण हरवतां नये. त्यातून आपला प्रवास विनाशाकडे होता नये. ते होऊ नये म्हणून, या देशावर जीवापाड प्रेम करणारी एक नागरिक म्हणून मी तुम्हा सगळ्यांना हे कळकळीचं आवाहन करते आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशाच्या रक्षणार्थ मी माझा मुलगा दिला आणि तो मला परत मिळाला नाही. एक वीरमाता म्हणून माझं तुम्हाला हे आवाहन आहे. भारताला आता नेमक्या कशा नेतृत्वाची गरज आहे ते ओळखून तुम्ही वागावं अशी माझी अपेक्षा आहे. क्रोधाचे ढग गडद होतात तेव्हा आरडाओरडा करणं म्हणजे ताकद नव्हे तर स्थिर राहाणं ही ताकद आहे हे तुम्ही सगळ्यांना दाखवून द्यावं असं मला वाटतं. मृतांना न्याय मिळवून द्यायचा आहे पण त्यासाठी हयात असलेल्यांच्या भविष्याशी खेळायचं नाही हे तुम्ही जमवायला हवं. 'स्टेट्समनशिप' चा अर्थ तुम्ही इतरांना दाखवून देण्याची गरज आहे. या परिस्थितीत तुम्ही क्रोधाने नाही तर सहानुभूतीने नेतृत्व कराल अशी अपेक्षा आहे. आपल्याकडे असलेल्या सैन्यदलांमधल्या माणसांची मोजदाद करताना ती फक्त एक माणसांची संख्या नाही तेवढ्या कुटुंबांची, स्वप्नांची आणि त्यांच्या प्रत्येकाच्या स्वतःच्या जगाची संख्या आहे, हे विसरु नका.

या देशाचे प्रमुख म्हणून तुम्ही हे सगळं कसं जमवणार याकडे जगाच्या नजरा लागल्या आहेत, आणि मुख्य म्हणजे आपल्या देशातली मुलंही मोठ्या अपेक्षेने तुमच्याकडे पहातायेत, हे लक्षात असू द्या. खरा नेता कसा असतो, कसा असायला हवा, हे त्यांना दाखवून द्या, प्लीज!

आणि आता पुन्हा जरा भारतीयांकडे वळते.

बंधूभगिनींनो, तुम्ही म्हणताय तसं, काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना काही मूठभर स्थानिक काश्मिरींकडून मदत मिळते, आसरा दिला जातो, हे खरंच.

पण काश्मीरकडे पाठ फिरवणं हा त्यावरचा उपाय नाही. उलट हीच वेळ आहे त्या मूठभर काश्मिरींकडे दुर्लक्ष करुन मोठ्या संख्येने शांतता हवी असलेल्या काश्मिरींसाठी आपला हात पुढे करण्याची. दहशतवाद हा तिरस्काराला खतपाणी घालतो. इतरांपासून तुटलेले, दुरावलेले, एकटे पडलेले किंवा पाडलेले यांना गाठून त्यांचे कान भरणं, त्यांना आपल्या बाजूला वळवणं दहशतवादाला सहज जमतं. काश्मीरच्या ट्रिप्स कॅन्सल करुन, तिथल्या व्यवसायांवर बहिष्कार घालून किंवा तिथल्या लोकांकडे पाठ फिरवून तुम्ही दहशतवाद्यांना अद्दल घडवत नसता तर त्यांना बळ देत असता हे लक्षात असुदे. एरवी ज्या तरुण मुलांनी शेती केली असती, लहानमोठा नोकरीधंदा केला असता ते तरुण आपण काश्मीरकडे पाठ फिरवल्यामुळे हाताला काम नसलेले, अस्वस्थ, रिकामे बसणार आहेत. त्यामुळे त्यांची माथी भडकवून त्यांना आपल्याकडे खेचून घेणं दहशतवाद्यांना सोपं जाणार आहे.

काश्मीरबद्दल खरंच तुमच्या मनात प्रेम असेल, तो भारताचा अविभाज्य भाग आहे असं तुम्हाला वाटत असेल तर तुम्हाला काश्मिरी लोकांना परकं करुन चालणार नाही. तुम्हाला काश्मीरची जमीन हवी, निसर्ग हवा पण तिथली माणसं नकोत हे कसं काय जमेल?

अर्थातच, काश्मिरी पंडितांना खोऱ्यात परत आणायला हवं. त्यांना न्याय मिळायला हवा. भूतकाळातल्या चुका सुधारायला हव्यात. लोकसंख्येचा समतोल साधायला हवा. पण हे सगळं स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन, त्यांच्या साथीने व्हायला हवं, त्यांना डावलून नाही! कारण सर्वसामान्य काश्मिरी लोक तुमच्याबरोबर असतील तर दहशतवादी काहीच करु शकणार नाहीत. कुठेही जरा खुट्ट झालं तरी स्थानिक काश्मिरींना त्याची जाणीव सगळ्यात आधी होते हा इतिहास आहे. १९४७ ला घुसखोरी झाली तेव्हा, नंतर कारगिल घडलं तेव्हाही काश्मिरी मेंढपाळ, गुज्जर, बकरवालांनीच त्याबद्दल सैन्यदलांना पहिली माहिती देत सावध केलं होतं, याची तुम्हाला कल्पना आहे का?

अगदी परवा पहलगाम झालं तेव्हाही पर्यटकांना मृत्यूच्या दाढेत न जाऊ देणारे, त्यांना खाऊपिऊ घालणारे आणि त्यांच्या संरक्षणासाठी जीव देणारे तेच स्थानिक काश्मिरी होते हे आपण विसरुन चालणार नाही. आपण त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा. त्यांचा आदर करायला हवा. आपल्याला जर खरंच दहशतवादाचा बिमोड करायचा असेल, पाकिस्तानला अद्दल घडवायची असेल, संपूर्ण काश्मीर आपलं असावं-ते आपल्याला परत मिळावं असं वाटत असेल तर माझ्याकडे एक योजना आहे. त्या योजनेत बळाचा वापर करण्याची गरज नाही.

काश्मीरला जा. तिथल्या लोकांच्यात मिसळा. त्यांची हॉटेल्स, बागा, बाजार हे तुमच्या अस्तित्वाने भरुन टाका. त्यांची सफरचंद, त्यांचे जर्दाळू, केशर, गालिचे, शाली विकत घ्या. तिथे व्यवसाय सुरू करा. दुकानं उघडा. तिथे रेल्वे स्टेशन्स, विमानतळ येऊदेत. धरणं, पूल उभे राहुदेत. त्यासाठी तुमची मनं आणि तुमच्या खिशातला पैसा हे माध्यम होऊ द्या! ही योजना राबवताना कुणाचे जीव जाणार नाहीत. विनाशही होणार नाही.

युद्धापेक्षा हे बरंच नाही का?

काश्मीर हे भारताचं अविभाज्य, तेजस्वी अंग व्हावं पण ते तेज विश्वासाचं हवं रणधुमाळीच्या आगीचं नाही. त्यासाठी आधी काश्मिरी लोक आपला अविभाज्य भाग असायला हवेत मात्र.

काश्मीरच्या गोष्टीचा उत्तरार्ध तिरस्काराने नाही तर प्रेमाने लिहिला जाऊ शकतो हे जगाला दाखवून देण्याची ही वेळ आहे. हे घडलं तर पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीरलाही फरक दिसेल, जाणवेल आणि तिथले लोक स्वतःच पाकिस्तानचं वर्चस्व नाकारतील!

बंदुकीची एक गोळीही न झाडता आपण काश्मीर राखू पाकिस्तानने बळकावलेलं काश्मीरही परत मिळेल. हे सगळं फक्त काश्मीर आणि काश्मिरींना आपलंसं केल्यामुळे साध्य होईल.

काश्मिरी लोकांनी आम्हाला वाचवलं, त्यांच्यामुळेच आम्ही आहोत हे पहलगाममधला दहशतवादी हल्ला अनुभवलेले पर्यटक आपल्याला जीव तोडून सांगतायेत. सर्वसामान्य काश्मिरी माणूस कष्टाळू आहे. कुटुंबवत्सल आहे. त्यांनाही वाटतं आपल्या मुलाबाळांनी शिकूनसवरुन, सर्वसामान्य भारतीयांसारखं शांत स्थिर आयुष्य जगावं.

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेला नृशंस हिंसाचार पाहिलेली, अनुभवलेली, त्यातून स्वतःचं सर्वस्व गमावलेली माणसं मानवतेवर विश्वास ठेवू शकतात तर आपणही तो ठेवायला हवा.

लक्षात ठेवा, युद्ध सुरु करणं सोपं पण ते संपवणं अशक्य असतं. तिरस्काराची आग शत्रुला भस्मसात करेलच, पण ती लावणाऱ्याला तरी ती कुठे मोकळं सोडणार आहे? फक्त सैन्यदलं ही भारताचं एकमेव बलस्थान नाहीत, न संपणारी स्वप्न, दुर्दम्य आशावाद आणि प्रेम या आपल्या सर्वात जमेच्या बाजू आहेत. त्यांचा विसर पडू देऊ नका. निवडण्याची वेळ येईल तेव्हा प्रेम निवडा. धैर्य निवडा. बुद्धिमत्ता निवडा. भारतमातेला निवडा.

माझ्या बोलण्याचा विचार करा.

दुःखात असले तरी आशा न सोडलेली आणि प्रार्थनेवर विश्वास ठेवणारी,

अभिजितची आई आणि अनेक 'मिग-२१' पायलट्सची माँ!

मूळ इंग्रजी पत्र - कविता गाडगीळ
अनुवाद - भक्ती बिसुरे.

## वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वाटणीपत्राचे नोंदणी शुल्कमाफ

**महसूल विभागाचे परिपत्रक जारी**

मुंबई

**राज्य** सरकारने वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क संपूर्ण माफ केले आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने नुकतेच जारी केले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांसह आपसातील संमतीने थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी येणाऱ्या वडिलोपार्जित शेत जमिनीच्या वाटणीपत्रांनाही नोंदणी शुल्कातून पूर्णपणे माफी देण्यात आली आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, एकाच कुटुंबातील सदस्यांनी आपसात वडिलोपार्जित जमिनीचे वाटप केल्यास त्याचे नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे अधिकार तहसीलदारांना होते. पण,काही लोक थेट दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन नोंदणी करत होते. त्यासाठीच्या नियमात स्पष्टता नसल्याने नोंदणी फी आकारली जात होती. ही अडचण दूर करण्यासाठी नव्याने हे स्पष्टीकरण देण्यात आले असून आता तहसीलदार किंवा नोंदणी कार्यालयात कुठेही गेला तरी नोंदणी फी भरावी लागणार नाही. याचा राज्यातील सर्व शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

## मानखुर्दमधील एमआयएमच्या नगरसेविकेचे पद धोक्यात! जातप्रमाणपत्र अवैध ठरवले

मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या मानखुर्द शिवाजीनगर येथील प्रभाग क्रमांक १३८ मधून निवडून आलेल्या एमआयएमच्या नगरसेविका रोशन शेख यांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे. जात प्रमाणपत्र समितीच्या पडताळणीत कागदपत्रे बोगस असल्याचे निष्पन्न झाल्याने रोशन शेख यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले आहे.

नगरसेविका रोशन सिंग यांचे नगरसेवकपद धोक्यात आल्यामुळे प्रभाग क्रमांक १३८ मध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेले सपाचे पराभूत उमेदवार महफूज आझमी यांनी नगरसेवकपद मिळावे, यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मात्र,जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचे एमआयएमचे गटनेते विजय उबाळे यांनी म्हटले आहे. जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर नगरसेविका म्हणून आपल्या पदाच्या जोरावर रोशन शेख यांनी मिळवलेले सर्व लाभ आणि मानधन त्यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

तसेच जात प्रमाणपत्र रद्द केल्याची नोंद अधिकृत दप्तरांमध्ये करावी आणि त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा, असे निर्देश जात प्रमाणपत्र समितीने पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांसह संबंधित विभागाला दिले आहेत.

## राजस्थानमध्ये धावत्या कारला आग कुटुंबातील पाच जण जिवंत जळाले

अलवर

**राजस्थानातील** अलवर जिल्ह्यात मध्यरात्री अत्यंत भीषण अपघात झाला. दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर धावत्या कारला अचानक आग लागल्याने एकाच कुटुंबातील पाच जण जिवंत जळाले. तर विनोद कुमार मेहर ८० टक्के भाजल्याने गंभीर जखमी झाला आहे.

लक्ष्मणगड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजपूरजवळ, द्रुतगती मार्गावरील ११५/३०० क्रमांकाच्या खांबाजवळ ही दुर्घटना झाली. दिल्लीहून कोटाकडे जात असताना कारला अचानक आग लागली. या दुर्घटनेत मध्य प्रदेशातील श्योपूर जिल्ह्यातील चैनपुरा गावचे रहिवासी असलेले पाच जण मृत्युमुखी पडले. मृतांमध्ये तीन महिला, एक पुरुष आणि एका लहान मुलीचा समावेश आहे. हे सर्वजण वैष्णो देवीचे दर्शन करून परतत होते. काही क्षणांतच आगीने संपूर्ण वाहनाला वेढा घातला. कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची कोणतीही संधी मिळाली नाही आणि काही मिनिटांतच कार जळून खाक झाली. वाहन सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही इंधनावर चालणारे होते. प्रवासादरम्यान सीएनजी गॅस गळती झाल्याने आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याने पोलीस तपास करत असल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे पथक आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले.

## सोलापुरात मारामारी सहा जण जखमी

**सोलापूर** - सोलापूर शहरातील महाराणा प्रताप झोपडपट्टीत दोन गटांमध्ये झालेली सिनेस्टाईल मारामारी झाली. गाडीला कट लागल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद झाला. हा वाद इतका वाढला की दोन्ही बाजूंनी एकमेकांवर हल्ला करण्यात आला. या मारामारीत सुमारे सहा जण जखमी झाले असून, सर्व जखमींवर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाणे आणि विजापूर नाका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

## मुंबई शहरातील पाणीकपातीचा थेट फटका ठाणे शहरालाही

ठाणे

**मुंबईत** जाहीर करण्यात आलेल्या पाणीकपातीचा थेट फटका ठाणे शहरालाही बसण्याची दाट शक्यता आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांमधील पाणीसाठा २८ टक्क्यांवर आल्यामुळे प्रशासनाने १५ मेपासून १० टक्के पाणीकपात जाहीर केली. या निर्णयामुळे मुंबईकडून ठाण्याला होणाऱ्या पाणीपुरवठ्यातही कपात करावी लागणार आहे.



मुंबई पालिकेकडून ठाणे पालिका क्षेत्राला दररोज ९० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा केला जातो. मुंबईत पाणीकपात लागू झाल्यामुळे त्याचा फटका प्रामुख्याने ठाण्यातील कोपरी आणि वागळे इस्टेट परिसराला बसू शकतो. कारण मुंबईच्या पाण्याचा वापर या भागात केला जातो. त्यामुळे या पुरवठ्यातही १० टक्क्यांची कपात होण्याची शक्यता आहे. ठाणे शहर आणि आसपासच्या परिसरातील पाणीपुरवठा प्रभावित होऊ शकतो.'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा पावसाचे आगमन लांबण्याची भीती असल्याने धरणांमधील पाणीसाठा वाचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. ठाणे महापालिका क्षेत्राला एमआयडीसी आणि स्टेम कंपनी या इतर स्त्रोतांकडूनही पाणी मिळते.

## २६/११ हल्ल्यातील आरोपीला चारित्र्य प्रमाणपत्र नाहीच

मुंबई

**मुंबईवरील** २६/११ हल्ल्याच्या खटल्यात निर्दोष सुटका झालेल्या आरोपी फहीम अर्शद मोहम्मद युसूफ अन्सारीला दिलासा देण्यास

**हायकोर्टाने याचिका फेटाळली**

हायकोर्टाने नकार दिला. रिक्षा चालवून घरचा उदरनिर्वाह करण्यासाठी पोलिसांकडून 'ना हरकत' प्रमाणपत्र मिळण्यासाठी फहीम याने केलेली याचिका न्या. अजय गडकरी आणि न्या. रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने बुधवारी फेटाळली.

ठाण्यात राहणाऱ्या अन्सारीने या प्रकरणात निर्दोष सुटका झाल्यानंतर 'पोलीस सेवा वाहन बॅज' मिळविण्याच्या हेतूने चारित्र्य प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. व्यावसायिक कारणांसाठी ऑटो-रिक्षा किंवा टॅक्सी चालविण्यासाठी हा बॅज अनिवार्य आहे. अन्सारी विरोधात लष्कर-ए-तोयबाचा सदस्य असल्याचा आरोप असल्याने प्रमाणपत्र देण्यास पोलिसांनी नकार दिला. त्यानंतर त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. त्याच्या याचिकेवर सविस्तर सुनावणी झाल्यानंतर हायकोर्टाने याचिकेवरील निर्णय राखून ठेवला होता. तो बुधवारी जाहीर करताना अन्सारीची याचिका फेटाळून लावली.


## बडनेरा-नाशिक रोड मेमू ट्रेन आता दररोज धावणार

जळगाव

**मध्य** रेल्वेने बडनेरा-नाशिक रोड मेमू ट्रेनला आता नियमित दर्जा दिला असून ती यापुढे सुधारित क्रमांक ६११२९/६११३० ने धावणार आहे. ही ट्रेन १२ डब्यांसह दररोज धावणार असून यामुळे जळगाव,भुसावळ, चाळीसगाव,पाचोरा,शेगाव आणि अकोला यांसारख्या स्थानकांवरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आतापर्यंत बडनेरा ते नाशिक रोड मेमू गाडी ०१२११/०१२१२ या क्रमांकासह धावत होती. मात्र आता हीच गाडी नियमित स्वरूपात धावताना ६११२९ आणि ६११३० या सुधारित क्रमांकासह धावणार आहे. ही विशेष गाडी म्हणून धावताना प्रवाशांच्या मागणीवरुन या गाडीला बऱ्याच वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र,आता ती नियमित स्वरूपात धावणार असल्याने प्रवाशांना अधिक सुलभ व कमी तिकीट दरात प्रवासाची हमी मिळणार आहे. विशेष म्हणजे बडनेरा ते नाशिक रोड दरम्यान यापुढील काळात १२ मेमू कार डब्यांसह धावणार आहे.

# शाहरुख खानने नाकारले ९५ लाख



**बॉलिवूडचा** बादशहा शाहरुख खान याच्या उदारपणाचे अनेक किस्से चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध आहेत. असाच एक जुना किस्सा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, तो शाहरुखच्या 'हम तुम्हारे हैं सनम' (२००२) या चित्रपटाशी संबंधित आहे. या चित्रपटाचे निर्माते के. सी. बोकाडिया यांनी एका मुलाखतीत सांगितले की, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरल्यानंतर शाहरुखने त्याचे उरलेले ९५ लाख रुपयांचे मानधन घेण्यास नकार दिला होता.


त्या काळाचा विचार करता ९५ लाख रुपये ही खूप मोठी रक्कम होती. चित्रपटाला अपेक्षित यश मिळाले नाही, हे पाहून शाहरुखने निर्मात्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला. शाहरुख निर्मात्यांना म्हणाला, जर मी हे पैसे घेतले, तर तुम्हाला तुमची मालमत्ता विकून ते द्यावे लागतील. मला तुमचे नुकसान करून पैसे घ्यायचे नाहीत. शाहरुख खानने केवळ आपले मानधनच सोडले नाही, तर चित्रपटाच्या जाहिराती आणि प्रसिद्धीसाठीही जोरदार प्रयत्न केले. 'हम तुम्हारे हैं सनम' या चित्रपटात शाहरुख खानसोबत सलमान खान आणि माधुरी दीक्षित यांच्याही प्रमुख भूमिका होत्या. हा चित्रपट तयार व्हायला बराच काळ लागला होता, तरीही शाहरुखने शेवटपर्यंत या प्रकल्पाला साथ दिली. कठीण प्रसंगात निर्मात्यांच्या पाठीशी उभे राहण्याची त्याची वृत्ती आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते.



# पायलने पत्रकार परिषद अर्धवट का सोडली?

**प्रसिद्ध** अभिनेत्री पायल राजपूत एका चित्रपटाच्या प्रसिद्धी कार्यक्रमादरम्यान आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकली नाही. एका पत्रकाराने तिच्या वैयक्तिक संघर्षावर आणि आरोग्याशी संबंधित आव्हानांवर प्रश्न विचारल्यामुळे पायल अत्यंत अस्वस्थ झाली.

हैदराबाद येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पायलने आपल्या वडिलांच्या कर्करोगाच्या निदानाबद्दल आणि त्या कठीण काळातून सावरण्यासाठी तिने घेतलेल्या विपश्यनेच्या अनुभवाबद्दल माहिती दिली. जेव्हा माझ्या वडिलांना कर्करोग असल्याचे समजले, तेव्हा तो काळ संपूर्ण कुटुंबासाठी, विशेषतः माझ्या आईसाठी अत्यंत वेदनादायी होता. मी पूर्णपणे कोलमडून गेले होते. स्वतःला आणि आईला कसे सावरू, हे मला समजत नव्हते. वडील माझ्या आयुष्यातील खरे हिरो होते, असे सांगताना पायलला रडू कोसळले. वडिलांच्या आठवणीत ती पुढे म्हणाली की, माझे वडील तिचे सर्वात मोठे समीक्षक होते. 'आरएक्स १००' सारख्या धाडसी चित्रपटातील माझ्या कामाचेही त्यांनी कौतुक केले होते. मात्र, आज ते सोबत नसल्याची उणीव प्रकर्षाने जाणवते. २०१६ पासून माझा भाऊ बेपत्ता असल्याने मी आधीच मोठ्या मानसिक धक्क्यात आहे, त्यातच वडिलांच्या निधनामुळे अधिकच खचले आहे. हे सांगताना तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लागल्या आणि हा कार्यक्रम अर्धवट सोडून ती निघून गेली.




# 'प्रलय'चा मार्ग मोकळा

अभिनेता रणवीर सिंह याच्या आगामी 'प्रलय' या चित्रपटाबाबत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. जय मेहता दिग्दर्शित हा 'झॉम्बी थ्रिलर' चित्रपट अडचणीत असल्याचे वृत्त फेटाळून लावत, या चित्रपटाचे चित्रीकरण ऑगस्ट २०२६ पासून सुरू होणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. काही दिवसांपूर्वी रणवीर सिंह आणि दिग्दर्शक यांच्यात वैचारिक मतभेद झाल्यामुळे प्रकल्प लांबणीवर पडल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र, निर्मिती संस्थेशी संबंधित सूत्रांनी या बातम्या निराधार असल्याचे स्पष्ट केले आहे. रणवीर आणि जय मेहता यांनी कथेवर अंतिम शिक्कामोर्तब केले असून, सध्या चित्रपट प्री-प्रोडक्शन टप्प्यात आहे. यामध्ये लोकेशन्सचा शोध, व्हीएफएक्सची तयारी आणि कलाकारांची निवड प्रक्रिया वेगाने सुरू आहे. 'प्रलय' हा चित्रपट एका पोस्ट-अपोकॅलिप्टिक जगावर आधारित भव्य ॲक्शन थ्रिलर असेल. हिंदी सिनेसृष्टीत 'झॉम्बी' हा प्रकार अद्याप फारसा हाताळला गेला नाही, त्यामुळे या चित्रपटाकडून प्रेक्षकांना मोठ्या अपेक्षा आहेत. नव्या धाटणीच्या भूमिकेसाठी रणवीर सिंह विशेष उत्सुक असल्याचे सांगण्यात येत आहे.



# नेहा शर्मा का ट्रोल होतेय?

**बॉलिवूड** अभिनेत्री नेहा शर्मा सध्या तिच्या इन्स्टाग्रामवरील नवीन 'सबस्क्रिप्शन मॉडेल'मुळे सोशल मीडियावर चर्चेत आली आहे. नेहाने तिच्या चाहत्यांसाठी एक्सक्लुझिव्ह कंटेंट पाहण्यासाठी दरमहा २९९ रुपयांचे सबस्क्रिप्शन शुल्क आकारण्यास सुरुवात केली आहे. यासाठी तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर 'सबस्क्राईब' बटण सक्रिय केले आहे. जे चाहते हे शुल्क भरतील, त्यांना तिचे विशेष फोटो, बिहाइंड द सीन्स आणि थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. अभिनेत्रीच्या या निर्णयामुळे नेटकऱ्यांनी तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. अनेक युजर्सनी नाराजी व्यक्त केली असून, सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काही नेटकऱ्यांनी या प्लॅटफॉर्मची तुलना 'ओनली फॅन्स' या सशुल्क ॲपशी केली आहे. एका बाजूला दाक्षिणात्य अभिनेत्री विनामूल्य उत्तम आशय देतात आणि दुसरीकडे बॉलिवूड अभिनेत्री अशा प्रकारे पैसे आकारत आहेत, अशी टीका एका युजरने केली आहे. तर काहींनी २९९ रुपयांत ओटीटी प्लॅटफॉर्मचे सबस्क्रिप्शन परवडते, केवळ फोटो पाहण्यासाठी एवढे पैसे कोण देणार? असा सवाल उपस्थित केला आहे. अलिकडच्या काळात अनेक सेलिब्रिटी इन्स्टाग्रामच्या या नवीन फिचरचा वापर करून चाहत्यांकडून ठराविक रक्कम आकारत आहेत. नेहा शर्मा सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असते आणि तिचे वर्कआउट व्हिडिओ तसेच बोल्ड फोटो चाहत्यांमध्ये लोकप्रिय आहेत.



# राहुल रॉय यांचे चोख प्रत्युत्तर

**प्रसिद्ध** अभिनेते राहुल रॉय यांनी त्यांच्या अलीकडील व्हिडिओंवर होत असलेल्या टीकेला आणि ट्रोलिंगला सोशल मीडियाच्या माध्यमातून सडेतोड उत्तर दिले आहे. सोशल मीडियावर काही व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी त्यांच्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त करण्यासोबतच त्यांच्यावर टीकाही केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी एक भावनिक आणि तितकीच खंबीर पोस्ट लिहिली आहे. राहुल रॉय लिहितात की, मी आपले काम अत्यंत प्रामाणिकपणे आणि नम्रपणे करत आहेत. माझ्यावर काही जुनी कायदेशीर प्रकरणे असून, त्यांचा खर्च भागवण्यासाठी मी काम करत आहे. हे खटले मला मेंदूचा झटका (ब्रेन स्ट्रोक) येण्यापूर्वीपासूनचे आहेत. आपल्या साधेपणाची किंवा संघर्षाची टर उडवणाऱ्यांना उत्तर देताना ते म्हणाले की, जर कोणाला खरोखरच काळजी वाटत असेल, तर त्यांनी मला चांगले काम मिळवून देण्यास मदत करावी. मेंदूच्या झटक्यानंतर स्वत:ला सक्रिय ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. जोपर्यंत जीवंत आहे, तोपर्यंत काम करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली असून, कामामुळे जगण्याचे उद्दिष्ट आणि जबाबदारीची जाणीव मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले. तुमच्या टीकेने कधीकधी त्रास होतो, पण तुम्ही माझा निर्धार मोडू शकत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला आत्मविश्वास व्यक्त केला.

# गोव्यात २ मे रोजी एकदिवसीय सातवे मराठी साहित्य संमेलन

■ पणजी

**गोव्यातील** साहित्यलेणी प्रतिष्ठान आणि इन्स्टिट्यट मिनेझिस ब्रागांझा यांच्या संयक्त विद्यमाने २ मे रोजी ७वे मराठी साहित्य संमेलन होणार आहे.हे संमेलन सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत इन्स्टिट्यट मिनेझिस ब्रागांझाच्या सभागृहात पार पडणार आहे,अशी माहिती रजनी रायकर यांनी दिली.या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर या संमेलनाध्यक्ष असतील. या संमेलनामध्ये गोव्यातील चार आणि महाराष्ट्रातील एका साहित्यकाच्या पुस्तकाचे प्रकाशन केले जाणार आहे.'कथा,कविता आणि कादंबरीमधील स्त्री जाणिवा' या विषयावर परिसंवाद,कालिका बापट यांच्याकडून पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांची,तर संगीता अभ्यंकर यांच्याकडून अनुराधा ठाकूर यांची मुलाखत,'कवितेची जुगलबदी' कार्यक्रम होणार आहे.त्यामध्ये ३४ कवी-कवयित्री सहभागी होणार आहेत.

# अष्टलक्ष्मी साखर कारखान्यावर कारवाईची मागणी ! शेतकरी चिंतेत



■ मुंबई

**उबाठाचे** खासदार संजय राऊत यांनी नाशिक जिल्ह्यातील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपी थकबाकीचा गंभीर मुद्दा उपस्थित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. अष्ट लक्ष्मी शुगर इथेनॉल अँड एनर्जी लिमिटेड या साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांना देयके न दिल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

राऊत यांनी पत्रात म्हटले आहे की, सुरुवातीला या कारखान्याचा ताबा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्तीयांकडे होता. त्यानंतर

**खा. राऊतांचे मुख्यमंत्र्यांना पत्र**

हा कारखाना माजी खासदार हेमंत गोडसे यांच्याकडे देण्यात आला. पुढे त्यांनी तो तिसऱ्या व्यक्तीला चालवण्यासाठी दिला. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हिताकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. डिसेंबर २०२५ पासून या कारखान्याकडे शेकडो शेतकऱ्यांनी उसाचा पुरवठा केला आहे. उस नियंत्रण कायद्यानुसार उस तोडल्यानंतर १४ दिवसांच्या आत पैसे देणे बंधनकारक असते. मात्र, साडेचार महिने उलटूनही शेतकऱ्यांना अद्याप एकही रुपया मिळालेला नाही. त्यामुळे शेतकरी तीव्र आर्थिक अडचणीत आले असून कर्जाचा बोजा वाढत चालला आहे. शेतकरी आधीच शेती खर्च, मजुरी, कर्जफेड यामुळे त्रस्त आहेत. त्यातच कारखान्याकडून देयके न मिळाल्याने त्यांची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

# आमदारकी हुकली तरी संयम ट्रोलिंगला केशव उपाध्येंचे प्रत्युत्तर

■ मुंबई

**राज्यातील** विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपाने आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली असून या यादीत काही अपेक्षित नावांना संधी न मिळाल्याने पक्षांतर्गत चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः पक्षाचे उपाध्यक्ष आणि दीर्घकाळ प्रवक्तेपद सांभाळणारे केशव उपाध्ये यांना समाज माध्यमांवर सतरंजी उचलणारे अशा शब्दांत ट्रोल करण्यात आले. यावरून उपाध्ये यांनी संघर्ष पथ पर जो मिले, यह भी सही असे म्हणत प्रत्युत्तर दिले आहे.

केशव उपाध्ये यांना उमेदवारी न दिल्याने राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत आहेत. गेल्या काही निवडणुकांमध्ये उपाध्ये यांच्या नावाची सातत्याने चर्चा होत होती, मात्र प्रत्येक वेळी अंतिम टप्प्यात त्यांना संधी मिळाली नाही. याबाबत केशव उपाध्ये यांनी एक्स पोस्ट करत म्हटले की घेतले न हे व्रत अंधतेने. केशव उपाध्ये पोस्टमध्ये म्हणाले की, २५-३० वर्षांपूर्वी विचारधारेचे काम सुरू करताना कुठे, काय, कोण, कधी होणार याचा विचार केला नव्हता. प्रखर राष्ट्रवादाची भावना आणि सकारात्मक काम करण्याची जिद्द यातूनच या प्रवासाला सुरुवात झाली. या प्रवासात आलेल्या संघर्षांचा उल्लेख करत त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या आवडीच्या शिवमंगल सिंह सुमन यांच्या कवितेतील संघर्ष पथ पर जो मिले, यह भी सही वह भी सही या ओळींचा संदर्भ दिला.

# चेंबूर,मानखुर्द,गोवंडीतील रस्ते अडकले वाहतूक कोंडीत

**पंधरा मिनिटाचे अंतर कापायला पाच तास**

■ मुंबई

**मानखुर्द** परिसरात कोसळलेली क्रेन वेळेत न हटवल्यामुळे काल बुधवारी दिवसभर मुंबईकरांना वाहतूककोंडीचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. प्रामुख्याने मुंबईचे प्रवेशद्वार असलेल्या चेंबूर,गोवंडी आणि मानखुर्द परिसरातील रस्त्यांवर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.पंधरा मिनिटाचे अंतर पार करायला काल पाच तास लागले. मंगळवारी रात्री कोसळलेली क्रेन हटविण्याचे काम दुसर्यादिवशी सुरू करण्यात आले. त्यासाठी नवी मुंबई आणि मुंबईला जोडणाऱ्या शीव-पनवेल महामार्ग बंद करण्यात आला. त्यामुळे चेंबूर,मानखुर्द, गोवंडी परिसरातून नवी मुंबईच्या दिशेने जाणार्या आणि गाड्या रस्त्यावर तासन्तास एकाच जागी उभ्या होत्या. आधीच रखरखते उन त्यातच मुंबईच्या प्रवेशद्वारावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्यामुळे मुंबईकर बेजार झाले.चेंबूरमधील घाटले गाव,सुभाषनगर परिसरातील छोट्या पर्यायी रस्त्यांवरही मोठे ट्रक,खासगी ट्रॅव्हल्स वळविण्यात आले होते. वाहतूककोंडी टाळण्यासाठी काही नोकरदारांनी लोकलचा पर्याय निवडला होता.

# वादग्रस्त वक्तव्यानंतर बागेश्वर बाबांनी शिवरायांच्या चित्राचा कुर्ता घातला

■ नागपूर



**नागपूर** येथे झालेल्या कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा पुन्हा एकदा चर्चेत आले. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर त्यांनी आपण शिवभक्त असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करत शिवरायांचे चित्र असलेला कुर्ता परिधान केला.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यासानिमित्त आयोजित धर्मसभेत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्यातील एक प्रसंग सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक युद्धांनंतर थकलेल्या शिवरायांनी स्वराज्य सांभाळण्याची विनंती रामदास स्वामींना केली होती. मात्र, यावर शिवप्रेमींनी आक्षेप घेतला. त्यांच्यावर इतिहासाशी विसंगत आणि दिशाभूल करणारे वक्तव्य केल्याचा आरोप केला.या वादानंतर राज्यभरातून प्रतिक्रिया उमटल्या आणि बागेश्वर बाबांनी अखेर माफी मागितली होती.

# तुळजाभवानी मंदिरात मे महिन्यात तीन दिवस व्हीआयपी दर्शन बंद

■ धाराशिव

**महाराष्ट्रातील** प्रमुख शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजाभवानी मंदिर येथे भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शुक्रवार १ मे ते रविवार ३ मे या कालावधीत सलग तीन दिवसांसाठी व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. या काळात कोणत्याही प्रकारचे व्हीआयपी पास देण्यात येणार नसून सर्व भाविकांना सामान्य रांगेतूनच दर्शन घ्यावे लागणार आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला येणाऱ्या सलग सुट्ट्यांमुळे तुळजापूर येथे मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी या कालावधीत मंदिर परिसरात मोठी गर्दी उसळते. त्यामुळे सुरक्षेच्या आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने व्हीआयपी दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंदिर प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मंदिर प्रशासनाच्या मते, व्हीआयपी दर्शन सुरू ठेवले असता सामान्य भाविकांच्या रांगा अधिक लांबतात आणि दर्शनासाठी लागणारा वेळ वाढतो. यामुळे अनेकदा गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. सर्व भाविकांना समान संधी मिळावी आणि दर्शन प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

# ४ तास उशीर ! मग विमान रद्द मुंबई विमानतळावर प्रवाशांचा गोंधळ

■ मुंबई

**मुंबईतील** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठा गोंधळ उडाला. स्पाईसजेटच्या विमान उड्डाणाला चार तास उशीर झाला आणि मग उड्डाण अखेर रद्द करण्यात आले. यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली. ही फ्लाइट टर्मिनल-१ वरून उड्डाण करणार होती.

या विमानाला सुरुवातीपासूनच विलंब होत होता. प्रवाशांना वारंवार उड्डाण वेळ पुढे ढकलल्याची माहिती दिली जात होती. मात्र, जवळपास चार तास प्रतीक्षा केल्यानंतर अचानक फ्लाइट रद्द केल्याची घोषणा झाली. यामुळे आधीच त्रस्त झालेल्या प्रवाशांनी संताप व्यक्त केला. प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

# कुंभमेळाच्या ७० कोटींच्या कामासाठी अध्यक्षांच्या बनावट सहीचा वापर

■ नाशिक

**कुंभमेळा** प्राधिकरण अध्यक्षांच्या बनावट सहीचा वापर करून तब्बल ७० कोटी रुपयांचे कंत्राट मिळवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नाशिक रोड पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेमुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. अज्ञात व्यक्तीने कुंभमेळा संदर्भातील कामांसाठी बनावट कागदपत्रे तयार करून दोन स्वतंत्र वर्क ऑर्डर काढल्या. प्रत्येकी सुमारे ३५ कोटी रुपयांच्या या ऑर्डर एकूण ७० कोटी रुपयांच्या आहे. विशेष म्हणजे, या वर्क ऑर्डरवर अध्यक्षांची बनावट सही करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.

या गैरप्रकाराचा पर्दाफाश तेव्हा झाला, जेव्हा प्रवीण गेडाम यांच्या निदर्शनास संबंधित कागदपत्रे आली आणि त्यांनी त्या सही आपली नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर तातडीने पोलीस तक्रार दाखल करण्यात आली. मोठ्या आर्थिक व्यवहाराशी संबंधित हा प्रकार असल्याने तपास यंत्रणा अधिक सतर्क झाली असून कंत्राट प्रक्रियेत कोणकोण सामील आहे, याचा शोध घेतला जात आहे.संबंधित कागदपत्रांची पडताळणी, डिजिटल पुरावे आणि व्यवहारांची साखळी तपासली जात आहे.

# विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष पुण्यात अभाविपचे आंदोलन

■ पुणे

**पुण्यातील** बिबवेवाडी येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी समोर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून आंदोलन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत हा निषेध नोंदवण्यात आला.अखिल भारतीय विद्यार्थी परिषद कार्यकर्त्यांनी संस्थेच्या कथित निकृष्ट कारभाराविरोधात घोषणाबाजी करत प्रशासनाचा निषेध केला. विशेषतः दुसऱ्या वर्षाचा निकाल लागण्यापूर्वीच पुढील वर्षाची संपूर्ण फी भरण्याची सक्ती केली जात असल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ही सक्ती त्वरित थांबवावी, तसेच सध्या देण्यात आलेली ३० एप्रिलची अंतिम मुदत रद्द करून निकाल जाहीर झाल्यानंतर किमान १५ दिवसांची मुदत द्यावी, अशी मागणी केली.

# हेलिकॉप्टरमधून एकाचवेळी २ क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी

■ नवी दिल्ली

**संरक्षण** संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) आणि भारतीय नौदल यांनी संयुक्तपणे हेलिकॉप्टरमधून शॉर्ट रेंज नेव्हल अँटी-शिप क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. बंगालच्या उपसागरात झालेल्या या चाचणीत हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे प्रक्षेपित करण्यात आली.

विशेष म्हणजे, एका हेलिकॉप्टरमधून काही सेकंदांच्या अंतराने दोन क्षेपणास्त्रे डागण्यात आली आणि दोन्हींनी लक्ष्य जहाजाच्या खालच्या भागावर अचूक साधले. या चाचणीद्वारे भारताने 'साल्वो लॉन्च' क्षमतेचे यशस्वी प्रदर्शन केले. या तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत एकाच प्लॅटफॉर्मवरून अनेक क्षेपणास्त्रे डागता येतात, ज्यामुळे शत्रूच्या रडार प्रणालीला चकमा देणे शक्य होते. ओडिशातील चांदीपूर चाचणी केंद्र येथे रडार आणि इतर यंत्रणांच्या मदतीने चाचणी यशस्वीरीत्या पार पडली.

